## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७
## सन २००७-२००८.

विषय क्रमांक :- १ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक :- १ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३९ चे तरतूदीनुसार श्रीमती अमिनाबी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा, टिळकरोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्द करणे बाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना -विषय - श्रीमती अमिना बी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा टिळक रोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्य करणे बाबत.

उपरोक्त विषयानुसार श्रीमती अमिना बी.शेख इस्माईल यांच्या मालकीच्या हजारी गादी कारखाना (कापूस पिंजाई)परवाना रद्य करणे बाबत सदर भागातील नागरिकांच्या वारंवार प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार,संबधित व्यवसाय धारक यांनी उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार म.न.पा. नगररचनाकार यांचे जा.क्र. १६२८ दि.२४/८/०७ ने ना -हरकत प्रमाण पत्र रद्य केले बाबत तसेच म.प्र.वि. मंडळ यांनी सदर व्यवसाय धारकांचे वस्तुस्थिती पाहुन समंती पत्र रद्य केले नुसार संपूर्ण प्रकरण प्रस्ताव सह म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४३९ पॅरा ४ पॅरा ५ चे संक्रमन कालीन तरतुदीनुसार तत्कालीन नगरपरिषदेच्या ॲक्ट १९६५ मधील कलम २८१ (२) अ अन्वये परवाना घेवून नुतनीकरण न केले बाबत तसेच कलम २८० प्रमाणे उपविधीमधील कलम ८ प्रमाणे गादी कारखान्याचा परवाना रद्य करणे बाबत सदर प्रकरणा बाबत विधी सल्लागार यांचे मतानुसार व मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा दिनांक ५/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री. तिवारी सु.र.:- आजचे सभेचे अजेंडयावर मागील सभेचे इतिवृत्त कायम करणेचा विषय घेतलेला नाही. जकातीचा विषय महत्वाचा होती त्याचे इतिवृत्त कायम केले शिवाय पुढील कार्यवाही तातडीने करणार का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदर प्रकारणी सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तातडीने करणे बाबत मा. सभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे जकातीचे विषयावर पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

मा.सभापती साहेब :- सभेचे इतिवृत्त पूर्ण झाले नसल्याने तो विषय सभेमध्ये घेतलेला नाही.

मा.श्री. तिवारी सु.र.:- पुढील सभे मध्ये मागील सभेचे व चालू सभेचे इतिवृत्त कायम करणे चा विषय घेणेत यावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- या गादी कारखान्याचे लायसन्स रद्द करणे बाबतचा विषय ही पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेणेत यावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदरचे व्यवसायाचे एनओसी प्रदुशन नियंत्रण मंडळाने रद्द केलेले असल्याने आपण सदर व्यवसायाचा परवाना रद्द करणे बाबत निर्णय घ्यावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- सदरचे व्यावसायाचे मालक व तक्रार दार यांचे शी चर्चा करतो. हा विषय पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घ्यावा.

मा.सौ. दिघे वि.रा. :- पुढील सभेत निर्णयासाठी घ्यावा.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव सर्वानुमते पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा

**ठराव** :-मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३९ चे तरतूदीनुसार श्रीमती अमिनाबी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा, टिळकरोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्द करणे बाबत प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :- २ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक :- २ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय** :-अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील पारिजात कॉलनी ( गुलमोहर रोड) ते तिरूमला बंगल्या पर्यत ८०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटर करणेचे वाढीव रक्कम रूपये ९,५३,५१२/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- पारिजात कॉलनी ( गुलमोहर रोड) ते तिरूमला बंगल्या पर्यत ८०० एम.एम. व्यासाची बंद पाईप गटर करणे व वाढीव रकमेस मान्यता मिळणे बाबत.

सविनय सादर,

उपरोक्त विषयानुसार खालील प्रमाणे अहवाल देण्यांत येतो की, सदर काम संबंधीत ठेकेदाराने जा.नं. ४७० च्या वर्कऑर्डर प्रमाणे सुरू केलेले आहे. सदर कामाच्या ठिकाणी प्रत्यक्षात पाहणी केली असता तेथे अंदाजपत्रकीय मापापेक्षा प्रत्यक्षात गटरची खोदाई जास्त करावी लागत आहे. मागील ओपन गटरची लेवल ( राजळे बंगल्याजवळ) पुढे पाणी वाहुन जाण्याच्या दृष्टीने घेतली असता खोदाईत वाढ होत आहे. तसेच जमिनीखाली मुळ अंदाजपत्रकात गृहीत धरलेल्या हार्ड रॉकच्या खोदाई पेक्षा हार्ड रॉक मोठया प्रमाणात लागल्याने व जमिनीत पावसाचे मुरलेले पाणी वाहत असल्याने कामामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. गटरची खोदाई ५ मीटर पर्यत खोल करावी. लागत असल्याने नागरिकांच्या सुरक्षितीतच्या दृष्टीने लेवल प्रमाणे तातडीने पाईप टाकून मुरूमाने बुजवून घेण्याचे आदेश ठेकेदारास दिलेले आहेत.

प्रत्यक्षात कामाचे मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रू. १४,९८,३३४/- इतकी असुन ठेकेदाराचे प्रत्यक्ष झ ालेले काम पाहता व काम पुर्ण होण्याच्या दृष्टीने फेर अंदाजपत्रक तयार केले आहे अंदाजपत्रकीय रक्कम रू. २४,५१,८४६/- इतका आहे.त्यानुसार रक्कम रू. ९,५३,५१२/-वाढीव खर्च येणार आहे. या मध्ये खोदाई व चेंबर या दोन प्रमुख बाबींच्या खर्चात वाढ होत आहे. सुधारीत अंदाजपत्रकात विट बांधकामाच्या चेंबर ऐवजी आर.सी.सी. चेंबर करणे ( खोलीच्या दृष्टीने) प्रस्तावीत आहे.

सोबत मुळ तसेच सुधारीत अंदाजपत्रक जोडण्यात आले आहे. प्रत्यक्ष कामाच्या निकडी नुसार बदल आवश्यक असल्याने वाढीव रकमेस मंजूरी मिळणे बाबत प्रस्ताव ठेवला आहे. तरी वाढीव रक्कम रू. ९,५३,५१२/- चे खर्चास व कामास मंजूरी मिळणेस सविनय सादर काम सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार गटर दुरूस्ती या लेखा शिर्षकांतर्गत उपरोक्त काम करता येईल तसेच मा. आयुक्त साहेब यांनी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करणे बाबत सुचित केलेले आहेत.

यास्तव अहवाल अवलोकनार्थ तसेच विषय मंजुरीसाठी मा. स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २२/१/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय** :-अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील पारिजात कॉलनी ( गुलमोहर रोड) ते तिरूमला बंगल्या पर्यत ८०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटर करणेचे वाढीव रक्कम रूपये ९,५३,५१२/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- वाढीव खर्च मंजूरी साठीचा प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :-ऑफिस रिपोर्टानुसार प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ.शे.र. :- मंजूर करणेत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील पारिजात कॉलनी (गुलमोहर रोड)ते तिरूमला बंगल्या पर्यत ८००एम.एम.व्यासाची बंद पाईपची गटर करणेचे वाढीव रक्कम रूपये ९,५३,५१२/-( रूपये नउ लाख त्रेपन्न हजार पांचशे बारा फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-३ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक :-३ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अर्जदार श्री. विद्ये गणेश गंगाराम यांना कै. बाळासाहेब देशपांडे उदयान येथील जलविहार जवळील भाडे कराराने दिलेल्या कॅन्टीन व मोकळया जागेचे दरमहा भाडे रू. ३,२००/- घेउन दिर्घमुदतीचे भाडे कराराने देणे बाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- अर्जदार श्री. विद्ये गणेश गंगाराम यांनी कै. बाळासाहेब देशपांडे उदयान येथील जलविहार जवळील कॅन्टीन व मोकळी जागेबाबत दीर्घ मुदतीचा भाडे करारनामा करून मिळणे बाबतचा अर्ज.

टिप्पणी- विनंतीपुर्वक अहवाल मार्केट विभागाकडून देण्यांत येतो की, सदर कॅन्टीन व त्यांचे उत्त्तरेकडील अंदाजित १४x २३ या मोजमापाची मोकळी जागा दरमहाभाडे रू. १,०००/- व अनामत रक्कम रू. १२,०००/-घेवुन तीन वर्ष कराराने मा.स्थायी समिती ठराव क्र. ७० दि. ३/१२/९९ रोजी देण्यांत आलेली आहे.

वरील मुदत संपल्यानंतर भाडेवाढकरवुन म्हणजेच दरमहा भाडे रू.१,२३०/- घेवुन मा.स्थायी समिती ठराव क्र. १६६ दि. १/४/०४ अन्वये तीन वर्षाची मुदत वाढवुन देण्यांत आलेली आहे.

श्री. विद्ये यांनी कराराची मुदत संपली आहे. दीर्घ मुदतीचा भाडे करारनामा करून मिळणे बाबत दि.२५/४/०७ रोजी अर्ज केला आहे.

मा.नगररचनाकार यांनी पाहणी करून त्यांचेकडील जा.नं. २१४४ दि. २४/९/०७ अन्वये अहवाल देउन कॅन्टीनचे मोजमापे २२' x२२' चौ. फुट आहे. व मोकळया जागेचे क्षेत्र १५'x ५०' चौ. फुट आहे. त्या सर्व क्षेत्राला दरमहा भाडे रू. ३,२००/- घेणे योग्य होईल तसेच मुंबई प्रांतिक अधिनियमाच्या कलम ७९ प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी असे या विभागास कळविले आहे.

सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ७९ व नुसार महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षा हून अधिक अशा कोणत्याही कालावधीसाठी पटयाने देणे इ ाल्यास त्यांस मा.स्थायी समितीची मंजुरीची आवश्यकता आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव घेणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक व करसंकलन अधिकारी यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय** :- अर्जदार श्री. विद्ये गणेश गंगाराम यांना कै. बाळासाहेब देशपांडे उदयान येथील जलविहार जवळील भाडे कराराने दिलेल्या कॅन्टीन व मोकळया जागेचे दरमहा भाडे रू. ३,२००/- घेउन दिर्घमुदतीचे भाडे कराराने देणे बाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.शेख आरिफ शे.र.:-दिर्घ मुदतीचे कराराने म्हणजे काय? किती वर्षासाठी जागा भाडयाने द्यावयाची आहे.

मा.श्री.तिवारी सु.र.:- जास्तीत जास्त तीस वर्षासाठी अर्जदार यांना जागा भाडयाने देण्यांत यावी.

मा.सौ.दिघे वि.रा.:- नियमानुसार जागा भाडयाने देण्यांत यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- पांच, दहा वर्षासाठी देण्यांत यावी.

मा.श्री.तिवारी सु.र.:-पंधरा वर्षाचे मुदतीसाठी अर्जदार यांना व्यावसायासाठी जागा भाडे कराराने द्यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- जागा पंधरा वर्षासाठी देण्यांस मंजूरी द्यावी.

मा.सौ.दिघे वि.रा.:- त्या प्रमाणे मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार यांना पंधरा वर्षासाठी व्यावसायाकरिता जागा भाडयाने देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी ऑफिस रिपोर्ट मंजूर करणेत यावा.

**ठराव** :-अर्जदार श्री. विद्ये गणेश गंगाराम यांना कै. बाळासाहेब देशपांडे उदयान येथील जलविहार जवळील भाडे कराराने दिलेल्या कॅन्टीन व मोकळया जागेचे दरमहा भाडे रू.३,२००/-( रूपये तीन हजार दोनशे फक्त)घेउन पंधरा वर्षासाठी व्यावसायाकरिता जागा भाडे कराराने देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-४ मंगळवार दिनांक ११/३/२००८
ठराव क्रमांक -४ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ९ मधील आगरकर मळा अंतर्गत श्री. खानदेशे घर ते संपवेल, संपवेल ते स्मृती कॉलनी पाण्याचे टाकी पर्यत, सागर कॉम्प्लेक्स ते स्मृती कॉलनी चौक, विशाल कॉलनी पर्यत रस्त्याचे मजबुती करण, डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये २८,५१,२४८/-चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर -** प्रस्तावना-विषय- प्र.क्र. ९ मधील आगरकरमळा अंतर्गत श्री. खानदेशे घर ते संपवेल, संपवेल ते स्मृती कॉलनी ते पाण्याचे टाकीपर्यत, सागर कॉम्प्लेक्स ते स्मृती कॉलनी चौक, विशाल कॉलनीपर्यत रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे.

मा.सादर,

विनंती रिपोर्ट की, मा. नगरसेवक श्री. अभय ज. आगरकर व मा. नगरसेविका सौ. गितांजली काळे, यांनी इकडेस यादी देवून वरील काम करणेचे सुचित केले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी आगरकरमळा पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलवाहिनी टाकणे करिता रस्त्याचे खोदकाम करण्यात आले. सद्यस्थितीत आगरकरमळयातील वरीलप्रमाणे रस्ते दुरूस्त करून त्यावर मजबूतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी मा. महापौरसाहेब, मा.आयुक्त साहेब यांनी वेळोवेळी समक्ष पाहणी करून जलवाहिनीचे काम पुर्ण झाल्यांनतर रस्ता दुरूस्त करून घेणेबाबत सुचित केले आहे. सदर ठिकाणी रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणेचे रक्कम रू.२८,५१,२४८/-(अक्षरी रक्कम रू.अठ्ठावीस लाख एक्कावन्न हजार दोनशे अठ्ठेचाळीस मात्र) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

तरी सदरचे काम म.न.पा. फंडातून रस्ते दुरूस्ती या लेखाशिर्षातून करणेस तसेच सदरच्या कामास व खर्चास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ९ मधील आगरकर मळा अंतर्गत श्री. खानदेशे घर ते संपवेल, संपवेल ते स्मृती कॉलनी पाण्याचे टाकी पर्यत, सागर कॉम्प्लेक्स ते स्मृती कॉलनी चौक, विशाल कॉलनी पर्यत रस्त्याचे मजबुती करण, डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये २८,५१,२४८/-चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- रस्त्याचे मजबुतीकरण डांबरीकरण करणेचे कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबतचा प्रस्ताव आहे.

मा. सौ. खरपुडे जं.सु.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सौ. दिघे वि.रा.:- मंजूर.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ९ मधील आगरकर मळा अंतर्गत श्री. खानदेशे घर ते संपवेल, संपवेल ते स्मृती कॉलनी पाण्याचे टाकी पर्यत, सागर कॉम्प्लेक्स ते स्मृती कॉलनी चौक, विशाल कॉलनी पर्यत रस्त्याचे मजबुती करण, डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये २८,५१,२४८/-(रूपये अठ्ठावीस लाख एक्कावन्न हजार दोनशे अठ्ठेचाळीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-५ मंगळवार दिनांक ११/३/२००८
ठराव क्रमांक - ५ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.खासदार श्री. तुकारामजी गडाख पाटील यांचे सन २००७-२००८ चे खासदार निधीतून केडगांव येथील नेप्ती रोड ते भाग्यादेय मंगल कार्यालया पर्यत रस्त्याचे मजुबतीकरण, डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रू. १३,५०,८६५/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर -** प्रस्तावना-विषय- प्र.क्र. ८ मध्ये मा. खा. श्री. तुकारामजी पाटील यांचे सन २००७-०८ या आर्थीक वर्षासाठी खा. स्था. वि. कार्यक्रमांतर्गत केडगांव येथील नेप्तीरोड ते भाग्योदय मंगल कार्यालयापर्यत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी ( नियोजन) अ. नगर यांचेकडील पत्र जा.क्र. १ / खास्थाविका / अंप/ २३४ दिनांक- ५/२/०८

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, मा.खा.श्री. तुकारामजी गडाख पाटील, यांनी अ.नगर महानगरपालिका हद्दीतील वरील ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम त्यांचे खासदार निधीतून करणेचे सुचित केले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणचा सद्यस्थितीतील रस्ता कच्चा आहे. सदर ठिकाणी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेचे सन ०७-०८ चे दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार केले असता सदर कामी रक्कम रू. १३,५०,८६५/- ( अक्षरी रक्कम रू. तेरा लाख पन्नास हजार आठशे पासष्ठ मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरच्या कामास व रक्कम रू.१३,५०,८६५/-चे खर्चास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- सदरची कामे लवकरात लवकर व्हावीत तसेच कामाचा खर्च वाढू नये.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- मा.खासदार तसेच मा.आमदार निधी मधून करावयाच्या कामांसाठी वाढीव खर्च मंजूर करता येत नाही.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- मजूर सोसायटी मार्फत सदरचे काम करून घेण्यात यावे.

मा.उपायुकत श्री. हांगे साहेब :- सदरची कामे ही रूपये पंधरा लाखाचे मर्याद मधील असल्याने ती मजूर सोसायटी मार्फत करून घेणे शक्य आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:-मजूर सोसायटी  मार्फत काम करून घेण्यात यावे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ.शे.र.:-  ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. मजूर सोसायटी  मार्फत काम करणेत यावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा मात्र सदरचे काम मजूर सोसायटी मार्फत एस्टीमेंट दराने करून घेण्यांत यावे.

**ठराव :-** मा.खासदार श्री. तुकारामजी गडाख पाटील यांचे सन २००७-२००८ चे खासदार निधीतून केडगांव येथील नेप्ती रोड ते भाग्यादेय मंगल कार्याल्या पर्यत रस्त्याचे मजुबतीकरण, डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट  रू. १३,५०,८६५/-( रूपये तेरा लाख पन्नास हजार आठशे पासष्ठ फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदरचे काम मजूर सोसायटी मार्फत एस्टीमेट दराने करून घेण्यास मान्यता देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :-  मा.श्री. शेख आरिफ शेख रफीउद्दीन

अनुमोदक :-  मा.सौ.दिघे विमल रामचंद्र

ऑफिस रिपोर्टानुसार  ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-६ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -६ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.खासदार श्री. तुकारामजी गडाख पाटील यांचे सन २००७-२००८चे खासदार निधीतून केडगांव परिसरातील मराठा नगर भागातील सुर्यवंशी महाराज घर ते पवार मॅडम घरापर्यत रस्त्याचे मजुबतीकरण,डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रू.११,९८,१९४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर -** प्रस्तावना-विषय- मा. खा. श्री. तुकारामजी पाटील यांचे सन २००७-०८ या आर्थीक वर्षासाठी खा. स्था. वि. कार्यक्रमांतर्गत केडगांव परिसरातील मराठानगर भागातील सुर्यंवंशी महाराज घर ते पवार मॅडम घरापर्यत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी ( नियोजन) अ. नगर यांचेकडील पत्र जा.क्र. १ / खास्थाविका / अंप/ २३४ दिनांक- ५/२/०८

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, मा.खा.श्री. तुकारामजी गडाख पाटील, यांनी अ.नगर महानगरपालिका हद्दीतील वरील ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम त्यांचे खासदार निधीतून करणेचे सुचित केले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणचा सद्यस्थितीतील रस्ता कच्चा आहे. सदर ठिकाणी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेचे सन ०७-०८ चे दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार केले असता सदर कामी रक्कम रू. ११,९८,१९४/- ( अक्षरी रक्कम रू. आकरा लाख आठ्ठयान्नाव हजार एकशे चौ-यान्नव मात्र ) खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरच्या कामास व रक्कम रू.११,९८,१९४/-चे खर्चास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मागील विषयाप्रमाणे मंजूर करावा.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- मजूर सोसायटी मार्फत काम करून घ्यावे.

मा.श्री. शेख आरिफ.शे.र..:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. दिघे वि.रा. :- प्रस्ताव मंजूर करावा. मजूर सोसायटी मार्फत काम करणेत यावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा. तसेच सदरचे काम मजूर सोसायटी मार्फत एस्टीमेंट दराने करून घेण्यांत यावे.

**प्रस्तावाचा विषय :-** मा.खासदार श्री. तुकारामजी गडाख पाटील यांचे सन २००७-२००८चे खासदार निधीतून केडगांव परिसरातील मराठा नगर भागातील सुर्यवंशी महाराज घर ते पवार मॅडम घरापर्यंत रस्त्याचे मजुबतीकरण,डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रू.११,९८,१९४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**ठराव :-** मा.खासदार श्री. तुकारामजी गडाख पाटील यांचे सन २००७-२००८ चे खासदार निधीतून केडगांव परिसरातील मराठा नगर भागातील सुर्यवंशी महाराज घर ते पवार मॅडम घरापर्यंत रस्त्याचे मजुबतीकरण,डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रू.११,९८,१९४/-( रूपये आकरा लाख अठ्ठयान्नव हजार एकशे चौ-यान्नव फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदरचे काम मजूर सोसायटी मार्फत एस्टीमेंट दराने करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफीउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमला रामचंद्र

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**

सन २००७-२००८.

विषय क्रमांक-७ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -७ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबडेकर स्मारकाचे नुतनीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर -** प्रस्तावना-विषय- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर स्मारकाचे नूतनीकरण करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता : मा.स्थायी समिती ठराव नं.७ दि. २६/१०/०७ अन्वये कामास मंजुरी

२. प्रशासकीय मान्यता रक्कमः रू. २०,९७,९९९/-

३. तांत्रिक मान्यता रक्कम :रूपये २०,९७,९९९/-

४. तांत्रिक मान्येतेची दरसूची .: सन ०७-०८

५. निवीदा (परिशिष्ट ' ब ') रक्कमः रू. २०,०५,९४९/-

६. निवीदा प्रसिध्दी तारीख : २४/११/०७

७. निविदा विक्री कालावधी : २७/११/०७ ते १२/१२/०७ ( १५ दिवस )

८.निविदा स्विकारण्याची तारीख : १५/१२/०७

१. निवीदा उघडण्याची तारीखः १८/१/०८

२. कामाची मुदत : ६महिने

३. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. दराडे मोहन, अ.नगर | ११.११ % जादा |
| २ | श्री. विजय म्हस्के, अ.नगर | १५.५० % जादा |
| ३ | श्री. हर्षद शिंदे, अ.नगर | १७.००% जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. दराडे मोहन, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा ११.११% जादा आहे. सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक ३०/१/२००८ च्या चर्चेला आला. तेव्हा निविदा दरापेक्षा ७.०० % जादा दराने करावे असे समितीने शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने श्री. मोहन दराडे, अ.नगर यांचा सुधारीत देकार ७.००% जादाचे पत्र दि. ३०/१/०८ अन्वये प्राप्त झाले आहे. सुधारीत देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारीत देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू. २१,४६,३६५/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां. ०७/०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. २०,०५,९४९/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. १,४०,४१६/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्के वारी (१२x१००)<br>११ | ७.००% जादा |
| १६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा चालू दरसुचीच्या( सन ०७-०८)तुलनेत ७.००% जादा दराची असल्याने अवलोकनार्थ व स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर स्मारकाचे नुतणीकरण करणे कामी आलेले कमीचे दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा. सौ. खरपुडे ज.सु.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. पवार स.बा .:- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर स्मारकाचे नुतनीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफीस रिपोर्ट पहाता श्री. दराडे मोहन , अहमदनगर यांचे चालू दर सुचीच्या ( सन २००७-२००८ ) तुलनेत ७.००% (सात टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

अनुमोदक :- मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**

सन २००७-२००८.

विषय क्रमांक-८ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -८ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २मधील शिलाविहार भागातील देव अपार्टमेंट ते औरंगाबाद रोड दरम्यान रस्ता डांबरीकरण करणे तसेच ३०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटर करणे चे कामास व एस्टीमेंट रूपये १६,०६,४३७/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर:-**प्रस्तावना-विषय- अ.नगर म.न.पा. हद्दीतील प्र.क्र. २ मधील शिलाविहार परिसरातील देव अपार्टमेंट ते औरंगाबाद रोड दरम्यान रस्ता डांबरीकरण करणे तसेच ३००एम.एम.व्यासाची बंद पाईप गटर करणे.

अ.नगर म.न.पा. हद्दीतील प्र.क्र.२ मधील शिलाविहार परिसरातील देव अपार्टमेंट ते औरंगाबादरोड दरम्यान रस्ता डांबरीकरण करणे तसेच ३०० एम.एम. व्यासाची बंद पाईप गटर करणे बाबत उपरोक्त रस्त्यांची समक्ष पाहणी करण्यात आली असुन सदरचा रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच सद्यस्थितीत सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारची सांडपाण्याची विल्हेवाट करणेची व्यवस्था नसल्याने डास व किटाणूंचा उपद्रव वाढलेला आहे, त्यामुळे नागरिकांना प्रंचड अडचणीना तोड द्यावे लागते.

त्यामुळे सदरील काम तातडीने करावे असे मा. नगरसेवक श्री. विनीत पाउत्रलबुध्दे यांनी पत्र देउन मागणी केल्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी करून सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००६-०७ व २००७-०८ चे दरसुची नुसार करण्यात आले असुन सदर कामास एकूण १६,०६,४३७/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च रस्ते दुरूस्ती या लेखाशिर्षका अंतर्गत महानगरपालिका फंडातून करावे लागणार आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजूरीसाठी पाठविणे करीता मा.आयुक्त साहेब यांनी दिनांक २२/२/०८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब:-डांबरीकरण व बंद पाईपची गटर करणेचे कामास व खर्चास मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.सौ.पवार स.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.दिघे वि.रा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २मधील शिलाविहार भागातील देव अपार्टमेंट ते औरंगाबाद रोड दरम्यान रस्ता डांबरीकरण करणे तसेच ३०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटर करणे चे कामास व एस्टीमेंट रूपये १६,०६,४३७/-( रूपये सोळा लाख सहा हजार चारशे सदवतीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूर देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर,

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-९ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -९ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ मधील लक्ष्मीनगर तपोवन रोड अतंर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये १२,००,९२०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर -** प्रस्तावना-विषय- अ.नगर म.न.पा. हद्दीतील प्र.क्र. २ मधील लक्ष्मीनगर, तपोवन रोड अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे.

अ.नगर म.न.पा. हद्दीतील प्र.क्र.२ मधील लक्ष्मीनगर, तपोवन रोड अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे बाबत उपरोक्त रस्त्यांची समक्ष पाहणी करण्यात आली असुन सदरचा रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे गरजेचे असल्यामुळे प्र.क्र. २ चे मा.नगरसेवक श्री. विनीत पाउत्र्लबुध्दे यांनी पत्र देउन मागणी केल्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी करून सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-०८ चे दरसुची नुसार करण्यात आले असुन सदर कामास एकुण रू. १२,००,९२०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च रस्ते दुरूस्ती या लेखाशिर्षका अंतर्गत महानगरपालिका फंडातून करावे लागणार आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजूरीसाठी पाठविणे करीता मा.आयुक्त साहेब यांनी दिनांक १२/२/०८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा. सभापती साहेब :- डांबरीकरणास व खर्चास प्रशासकीय मंजूरी साठीचा प्रस्ताव आहे.

मा.सौ.पवार स.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ मधील लक्ष्मीनगर तपोवन रोड अतंर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये १२,००,९२०/- ( रूपये बारा लाख नउत्र्शे वीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**

सन २००७-२००८.

विषय क्रमांक-१० मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -१० मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ मधील सुर्यनगर तपोवन रोड अंतर्गत रस्ताचे डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये १४,०६,८८२/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर -** प्रस्तावना-विषय- अ.नगर म.न.पा. हद्दीतील प्र.क्र. २ मधील सुर्यनगर, तपोवन रोड अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे.

अ.नगर म.न.पा. हद्दीतील प्र.क्र.२ मधील सुर्यनगर, तपोवन रोड अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे बाबत उपरोक्त रस्त्यांची समक्ष पाहणी करण्यात आली असुन सदरचा रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे गरजेचे असल्यामुळे प्र.क्र. २ चे मा.नगरसेवक श्री. विनीत पाउत्र्लबुध्दे यांनी पत्र देउन मागणी केल्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी करून सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-०८ चे दरसुची नुसार करण्यात आले असुन सदर कामास एकुण रू.१४,०६,८८२/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च नवीन रस्ते या लेखाशिर्षका अंतर्गत महानगरपालिका फंडातून करावे लागणार आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजूरीसाठी पाठविणे करीता मा.आयुक्त साहेब यांनी दिनांक १२/२/०८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- डांबरीकरणाचे कामास व खर्चास मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.सौ. पवार स.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.दिघे वि.रा. :- मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ मधील सुर्यनगर तपोवन रोड अंतर्गत रस्ताचे डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये १४,०६,८८२/- ( रूपये चौदा लाख सहा हजार आठशे ब्याऐशी फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-११ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -११ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सक्कर कारखाना चौक ते आयुर्वेद हॉस्पीटल पर्यत रस्त्याचे सुशोभिकरण करणे चे कामाचे ( लेबर, मटेरिअल,इंधन (POL) व डांबर इत्यादी किंमती मधील रक्कम रूपये ११,६२,०१२/- चा फरक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपणी, अ.नगर यांना अदा करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर -** विषय- सक्कर कारखाना चौक ते आयुर्वेद हॉस्पीटल पर्यत रस्त्याचे सुशोभिकरण करणे कामाकरीता किंमती मधील तफावती बाबत ( लेबर, मटेरिअल,इंधन (POL) व डांबर इत्यादी बाबत

सादर,

वर नमुद केलेले काम ठेकेदार मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना वर्क ऑर्डर नंबर १७५ दि. ३/११/२००३ अन्वये दिलेले आहे. काम पुर्ण करण्याची मुदत दि. २/४/२००४ पर्यत दिलेली होती. परंतु रस्त्याचे जागेवरील अतिक्रमणे हलविण, इले. व टेलीफोन खांब हलविणे, ड्रेनेज लाईन व पाणी पुरवठा लाईनची कामे करणे करीता महापालिकेस विलंब झाला. त्यामुळे ठेकेदार यांना दिलेल्या मुदतीमध्ये काम पुर्ण करणे अशक्य झाले. सदर कामापैकी साईड गटारी, रस्त्याचे मजबुतीकरण २००५ पर्यत पूर्ण करण्यात आले होते व डांबरीकरणाचे काम शिल्लक होते. दरम्यान सदर रस्ता हा राष्ट्रीय महामार्गाचा भाग झाल्याने सदर रस्त्याचे काम बंद ठेवण्याबाबत ठेकेदार यांना कळविण्यांत आले होते ( पत्र क्र. ६१८ दि. १४/९/२००५) त्यानंतर नागरिकांना व दुकानदारांना धुळीचा त्रास सुरू झाल्याने त्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतल्यामुळे सदरचे काम पुन्हा सुरू करणे बाबत ठेकेदार यांना पत्र क्र. १४३३ दि. २२/२/२००६ अन्वये कळविण्यांत आलेले आहे.

सदर कामापैकी साईड गटार, रस्त्याचे मजबुतीकरण इ. कामे सन २००५ पर्यत पुर्ण करण्यात आले डांबरीकरणाचे काम शिल्लक राहिले होते. दरम्यान सदर रस्ता हा राष्ट्रीय महामार्गाचा भाग झाल्याने सदर रस्त्याचे काम बंद ठेवण्याबाबत ठेकेदार यांना बांधकाम विभाग, जा.क्र. ६१८ दि. १४/०९/२००५ रोजी कळविण्यांत आले होते.

त्यानंतर तेथील नागरिकांनी उर्वरीत काम पुर्ण करण्यासाठी आंदोलनाचा पवित्रा घेतला. त्यानुसार तत्कालीन मा.आयुक्त, शहर अभियंता यांनी आंदोलन करणा-या नागरिकांची प्रत्यक्ष रस्त्याचे जागेवर भेट घेवून सदरचे काम त्वरीत सुरू करणे बाबत सुचना दिल्या.

त्यानुसार काम सुरू करण्यासाठी बांधकाम विभाग जा.क्र. १४३३ दि./२२/२/२००६ अन्वये संबंधीत काम पुन्हा सुरू करणेचे आदेश देण्यांतआले त्यावरून ठेकेदार यांनी काम सुरू करून पुर्ण केलेले आहे.

सदर कामाचे मंजुर ब-१ निविदा करारनामा, भाग-५ विशेष शर्त क्र.३० तरतूदीप्रमाणे किंमतीमधील तफावत देय होत आहे. तफावतीचा सर्व खर्च काढला असता तो रू. ११,६२,०१२/- इतका आहे.

काम बंद करून पुन्हा सुरू करणे कामी कालावधी गेल्यामुळे मटेरिअलच्या किंमतीमधील झालेल्या तफावतीची मागणी संबंधीत ठेकेदाराने केलेली आहे.

तफावतीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, यांनी जा.क्र. ७९४१ दि. ११/१०/२००६ अन्वये भाववाढ व डांबर फरक त्यांचे निर्देशांकानुसार तपासून बरोबर असलेचे कळविले आहे. तसेच तत्कालीन शहर अभियंता यांनी निविदा शर्ती प्रमाणे भाववाढ देणे योग्य होईल असा रिपोर्ट दिलेला आहे.

| | |
|---|---|
| निविदा रक्कम | १,१५,१४,३००.०० |
| अधिक ४.९९ टक्के जादा मंजूर निविदाप्रमाणे प्रशासकीय मान्यता | ५,७४,५६८.०० |
| प्रशासकीय मान्यता | १,२०,८८,८६४.०० |
| सदर कामाचे चौथे व अंतीम बिलाची एकुण रक्कम ( आत्तापर्यंचा एकूण खर्च ) | ८९,४६,९४९.०० |
| किंमतीतील तफावतीची रक्कम | ११,६२,०१८.०० |
| एकुण | १,०१,०८,९६७.०० |

वरील तपशीलावरून सदर कामाचे खर्चामध्ये रू. १४,२५,३३९/- रूपये शिल्लक राहणार आहेत. याप्रमाणे काम बंद करण्यास सांगितलेले दुसरे काम नसुन ठेकेदारास तफावतीमधील रक्कम रू. ११,६२,०१८/- इतकी अदा करणे बाबत रिपोर्ट मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेले चर्चा.

मा.सभापती साहेब :- कामाचे फरकाची रक्कम अदा करणेस मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सक्कर कारखाना चौक ते आयुर्वेद हॉस्पीटल पर्यत रस्त्याचे सुशोभिकरण करणे चे कामाचे ( लेबर, मटेरिअल,इंधन (POL) व डांबर इत्यादी किंमती मधील रक्कम रूपये ११,६२,०१२/- (रूपये आकरा लाख बासष्ठ हजार बारा फक्त)चा फरक मे बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपणी यांना अदा करणेस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफीउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-१२ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -१२ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पिंपळगाव माळवी तलावातून अर्जदार श्री. झिने शंकर भाउ्र यांना सन २००८-२००९ या वर्षाकरिता वार्षिक पाणी पट्टी रू. ४२१७/- व अनामत रक्कम रूपये ७०००/- घेउ्रन शेतीसाठी पाणी उचलनेस परवानगी देणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रस्तावना-विषय- पिंपळगाव माळवी तलावातून शेतीसाठी पाणी उचलणेस परवानगी मिळणेबाबत श्री. शंकर भाउ्र झिने, रा. पिंपळगाव माळवी ता.जि. अहमदनगर यांचा दि.२/३/०७ चा अर्ज.

टिप्पणी-उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून रिपोर्ट देण्यांत येतो की, श्री. शंकर भाउ्र झिने, रा. पिंपळगाव माळवी ता.जि. अ.नगर यांना पिंपळगाव माळवी तलावातून शेतीसाठी पाणी उचलणेस मंजूरी देण्याचा प्रस्ताव मान्य झाला असून शेतीसाठी पाणी उचलणेस पाणी पुरवठा जा.क्र. ७४, दि. १८/४/०६ ने श्री. झिने यांना अनामत रक्कम रू.७०००/- व एक वर्षाची पाणी पट्टी रू. ४२१७/- पाणी पुरवठा विभागाकडे भरणेस व रू. १००/- चे स्टॅप पेपरवर करारनामा करून दिल्यानंतर परवानगी पत्र देण्यांत येईल, असे लेखी पत्राने कळविले असता तलावात पाणी नसल्याने त्यांनी सदरचे वर्षी सन २००६-०७ मध्ये वरील रकमा न भरल्याने प्रकरण स्थगित ठेवले होते.

तथापी त्यांनी दि. २/३/०७ रोजी पुन्हा अर्ज देवून चालू वर्षी तलावात पाणी असल्याने वरील अनामत रक्कम रू. ७०००/- व वार्षीक पाणीपट्टी रू. ४२१७/- त्वरीत भरणेस तयार असून परवानगी मिळणेबाबत अर्ज दिला आहे.

तरी अर्जदार यांचेकडून वरील अनामत रक्कम व वार्षीक पाणीपट्टी भरून घेवून तसेच रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घेउन करारनाम्यातील अटी व शर्तीस अधीन राहून सन २००८-२००९ या एक वर्षाकरिता पिंपळगाव माळवी तलावातून शेतीसाठी पाणी उचलणेस परवानगी देणेबाबत मा.आयुक्त साहेब, यांचे आदेशान्वये सदरचे प्रकरण मा.स्थायी समितीकडे पाठवून उचित निर्णय घेणेस मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः- पिंपळगागंव माळवी तलावामधून शेतीसाठी पाणी उचलणेस परवानगी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.
मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सौ. खरपुडे ज.सु :- मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पिंपळगाव माळवी तलावातून अर्जदार श्री. झिने शंकर भाउ्र यांना सन २००८-२००९ या वर्षाकरिता वार्षिक पाणी पट्टी रू. ४२१७/- (रूपये चार हजार दोनशे सतरा फक्त) व अनामत रक्कम रूपये ७०००/-( रूपये सात हजार फक्त) घेउ्रन शेतीसाठी पाणी उचलनेस परवानगी देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र
अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश
ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-१३ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -१३ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषयः-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५ मधील माळीवाडा चौक ते डॉ. बाबासाहेब आंबडेकर पुतळया पर्यतचे एल.टी व एच.टी इलेक्ट्रीकल पोल हलविणे व संपूर्ण केबल अन्डर ग्राउन्ड करणेचे कामास व एस्टीमेट रूपये १२,०९,५७८/-चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रति, मा.स्थायी समिती,सभापती, अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर प्रभाग क्र. ५ मधील आंबेडकर रोड वरील हायटेन्शन पोल व कोटेशेन पोल इ.लोटेंशन पोल रस्त्याच्या मध्यभागी असल्याने रहदारीस अडाथळा निर्माण होत आहे नव्यानेच रस्ता रूंदीकरणाचे काम हाती घेतले आहे. सदर काम युध्दपातळीवर सुरू असून रस्ता रूंदीकरणास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. अ.नगर यांचे मालकीचे पोल रूंदीकरणा दरम्यान येत असून सदरील पोल बाजूला हलविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस १.३%चे सुपरविझन चार्जचे कोटेशन महानगरपालिकेने भरलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेस पोल हलविण्याचे काम करावे लागेल.

प्रभाग क्र. ५ मधील आंबडेकर चौक ते माळीवाडा वेस कॉर्नर पर्यत एलटी पोल व एच.टी पोल हलविणे व संपूर्ण केबल अंडर ग्राउंड टाकणे.

विदयुत पोल हलविणेबाबतचे कामाचे अंदाजपत्रक सन २००७-०८ सालचे सार्वजनिक बांधकाम, विदयुत विभाग यांचे दरसुची नुसार बनविणे आहे. सदर कामाचे सन २००७-०८ सालचे टेंडर मंजूर नसल्याने काम जाहिर निविदा प्रसिध्द करून टेंडर पध्दतीने करावे लागेल. कामास अंदाजपत्रकानुसार रक्कम रू. १२,०९,५७८/- (अक्षरी रू. बारा लाख नउ हजार पाचशे अठ्ठयाहत्तर मात्र) चे खर्चास मा.आयुक्त साहेब यांची मंजूरी दि.१६/२/०८ ला मिळाली आहे तसेच मा.स्थायी समिती ची प्रशासकीय मंजूरी मिळणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे इलेक्ट्रीकल विभाग प्रमुख श्री. बाळासाहेब सावळे यांचा अहवाल असे.दि. २७/२/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- सदरचे रस्त्या मधील पोल हलविलेले आहेत का?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- रस्त्या मधील जुने पोल काढलेले आहेत.

शहर अभियंता श्री.पालवे व्ही.डी.:- डांबरीकरणामध्ये येणारे पोल काढलेले असून संपूर्ण केबल अंन्डर ग्राउन्ड करणे आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सौ. खरपुडे ज.सु. :- मंजूर करावा.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- आपले म.न.पा. हद्दीतील आस्तीत्वातील लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे कामी मागविण्यांत आलेल्या कृपा स्टील इंडस्ट्रीज, नाशिक यांचे निविदा दरास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८ दिनांक ७/१/२००८ अन्वये मंजूरी दिलेली आहे. परंतु सदर निविदा धारकांची असलेली टेक्नालॉजी आपले म.न.पा. करिता सुयोग्य नसल्याने प्रशासनाने ती मंजूर केलेली नाही. प्रशासनाने एशियन इलेक्ट्रॅनिक्स ठाणे यांची निविदा म.न.पा.च्या दृष्टीने आर्थीक हितावर असल्याने स्विकारणे विषयी शिफारस केलेली होती.

सदर एनर्जी सेव्हिंग योजना आपले म.न.पा. मार्फत राबविणे विषयीची कार्यवाही एक वर्षा पासून सुरू केलेले आहे. परंतु ती अद्याप ही मार्गी लागलेली नाही. इतर म.न.पा. ने सदर योजना स्विकारून राबविलेली असल्याने आपले म.न.पा. मार्फत ही सदर योजना मार्गी लावणे कामी प्रशासनाने सदर प्रकरणी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे पुढे चर्चे करिता सादर करावा.सभेने त्यावर त्वरीत निर्णय घेउन योजना मार्गी लावावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अस्तीत्वातील लाइट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे कामी मागील सभा दिनांक ७/१/२००८ रोजीचे सभेत मंजूर केलेली कृपा स्टील इंडस्ट्रीज, नाशिक येथील कंपनीची निविदा आपले मनपा हद्दीत असलेल्या स्ट्रीट लाईट साठी सुयोग्य नसल्याने प्रशासनाने त्या विषयी पुढील कार्यवाही केली नाही. अशी योजना मार्गी लावणे साठी पुढील कार्यवाही करावी अशा बाबतची यादी मा. सदस्यांनी माझे कडेस दिलेली आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-आपणांकडेस आलेल्या पत्राप्रमाणे आपण आपले वतीने प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी असे मा.आयुक्त साहेबांकडेस सविस्तर पत्र द्यावे.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करावा. तसेच अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईटचे फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे कामीची योजना कार्यान्वयीत करणे करिता प्रशासनाने सदर प्रकरणी सविस्तर प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे पुढे मंजूरी साठी सादर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५ मधील माळीवाडा चौक ते डॉ. बाबासाहेब आंबडेकर पुतळया पर्यतचे एल.टी व एच.टी इलेक्ट्रीकल पोल हलविणे व संपूर्ण केबल अन्डर ग्राउन्ड करणेचे कामास व एस्टीमेट रूपये १२,०९,५७८/- ( रूपये बारा लाख नउ हजार पांचशे अठठयाहत्तर फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईटचे फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे कामीची योजना कार्यान्वयीत करणे करिता प्रशासनाने सदर प्रकरणी सविस्तर प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे पुढे मंजूरी साठी सादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफीउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ.खरपुडे जयश्री सुरेश

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-१४ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -१४ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ९२ (२) नुसार शिलकी पैशांची गुंतवणूक करणे किंवा गुंतवलेला पैसा आवश्यक ते नुसार काढून घेणे किंवा परत गुंतवणूक करणे बाबतचे अधिकार प्रदान करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रति, मा. नगरसचिव, महानगरपालिका अ.नगर, विषय- शिलकी पैशाची गुंतवणूक करताना मा.स्थायी समितीची मंजूरी न घेता मा.आयुक्त महानगरपालिका यांना अधिकार प्रदान करणेबाबत.

वरील विषयान्वये सादर करणेत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२(१) अन्वये नगरपालिका निधीत जमा असलेल्या ज्या शिलकी पैशाचा विनियोग या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये उभारलेल्या कोणत्याही कर्जाच्या प्रयोजनासाठी ताबड्तोब किंवा लवकर करता येणे शक्य नसेल तर त्या पैशाची गुंतवणूक करता येईल,अशी तरतूद आहे.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२(२) अन्वये स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने अशा सर्व ठेवी व गुंतवणूका करतील.

तथापी सदरची बाब ही प्रशासकीय असल्याने तसेच गुंतवणूक करताना जादा कालावधी लागू नये या हेतुने तसेच व्याजाचे नुकसान होउ नये यादृष्टीने स्थायी समितीची प्रत्येक वेळी मंजूरी न घेता मा.आयुक्त यांचे मंजूरीने गुंतवणूक करणे किंवा गुंतविलेला पैसा आवश्यकतेनुसार काढून घेणे किंवा परत गुंतवणूक करणे या बाबतचे निर्णय घेणे बाबतचे अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करणे करिता स्थायी समितीकडे निर्णयार्थ सादर.

येणे प्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मुख्य लेखाधिकारी श्री. कडीर्ले यांनी प्रस्तावाची माहिती द्यावी.

मुख्य लेखाधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- नगरपालिका निधीत जमा असलेली शिलकी रक्कम विजया बँन्क महाराष्ट्र बँन्क, देना बँन्क इत्यादी अशा राष्ट्रीयकृत बॅन्कामध्ये जादा व्याज देईल त्या दृष्टीने ठेवी ठेवीत असता त्या करिता मा.स्थायी समितीच्या मंजूरीने मा.आयुक्त साहेब महानगरपालिकेच्या वतीने ठेवी व गुंतवणूका करतील अशी मनपा अधिनियमात तरतूद आहे . पंरतु य प्रक्रियेतस कालावधी लागतो त्यामुळे म.न.पाचे व्याजाचे आर्थिक नुकसान होतो त्या करिता मा. सभेने असे अधिकार मा.आयुक्त साहेबांना दिल्यास निधीची गुंतवणूक करणेस वेळ लागणार नाही तसेच सकाळी पूर्तता केल्यास दुपारपर्यत आपणास गुंतवणूक केलेला निधी उपलभ्द होउ शकतो.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपण एखादया योजनेसाठीची राखीव निधी अशा प्रकारे गुंतवणूक करू ठेउ शकतो समजा रूपये एक कोटीचा निधी आपण ठेवल्यास त्या पासून आपणांस व्याज मिळेल व योजनेचे काम जसे सुरू होईल त्या नुसार पंचवीस लाखाचे कामाची बीले देउन उर्वरीत रक्कम पुन्हा ठेव म्हणून सदर योजनेचा राखीव निधी ठेवू शकतो. अशा प्रकारे पुन्हा काढून पुन्हा ठेउ शकतो.रनिंग अकौटं वर आपणांस जास्त व्यास मिळत नाही.

मुख्य लेखाधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- मुदत पूर्व ठेवी आपण आवश्यकते नुसार बँन्कामधून काढू शकतो. या पूर्वी अशी मंजूर घेणे आवश्यक होते ती घेतलेली नाही. सदरचे अधिकार मा.आयुक्त साहेबांना दिल्यास सदर कामी पूर्तता करणे साईस्कर होईल. ही प्रक्रिया वेळ खाउ्त होणार नाही.

लेखापरिक्षक श्री. गोरे पी.आर. :- कर्मचा-याचे प्राव्हींडट फंडातील रकमा अशा पध्दतीने गुंतवणूक करून ठेवतो.

मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आ.शे.र. :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव** :- मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ९२ (२) नुसार शिलकी पैशांची गुंतवणूक करणे किंवा गुंतवलेला पैसा आवश्यक ते नुसार काढून घेणे किंवा परत गुंतवणूक करणे बाबतचे अधिकार प्रदान करणेस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफीउद्दीन

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-१५ मंगळवार दिनांक ११/३/२००८

ठराव क्रमांक -१५ मंगळवार दिनांक ११/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १७ मधील माळीवाडा वेस ते फुलसौंदर चौक पंचपीर चावडी पर्यतच्या रस्त्याचे ४०एम.एम. जाडीचे आस्फाल्टीक कॉक्रीट( डांबरीकरण) करणेचे कामास व एस्टीमेंट रू. १०,५२,८७१/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रस्तावना-विषय-प्र.क्र.१७ मधील माळीवाडा वेस ते फुलसौदंर चौक पंचपीर चावडी पर्यंतच्या रस्त्याचे ४० एम.एम. जाडीचे अस्फॉल्टीक कॉक्रीट ( डांबरीकरण) करणे.

संदर्भ :- मा.नगरसेवक श्री. गिरवले कैलास रामभाउ यांचे सुचनेनुसार

उपरोक्त विषय संदर्भिय पत्रान्वये विनंती रिपोर्ट की, प्र.क्र. १७ मधील माळीवाडा वेस ते फुलसौंदर चौक पंचपीर चावडी पर्यतच्या रस्त्याचे ४०एम.एम. जाडीचे अस्फॅाल्टीक कॉक्रीट ( डांबरीकरण) करणे. मा.नगरसेवक श्री. गिरवले कैलास रामभाउ यांनी सुचविले आहे.

सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर भागात १० वर्षा पुर्वीचे डांबरीकरण असून वेगवेगळया खोदाईमुळे रस्ता अत्यंत खराब व नादुरूस्त झाला असल्याने पावसाळयात चिखल होतो. त्यामुळे सदर भागात नवीन डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

सन-२००७-२००८चेसार्व.बांधकाम नाशिक,विभाग यांचेकडील दरसुची नुसार रक्कमरू. १०,५२,८७१/- चे अंदाजपत्रक असुन सदरचा खर्च सन २००७-२००८ चे अंदाजपत्रकातील शहरातील रस्ते डांबरीकरण करणे या लेखाशिर्षका अंतर्गत खर्च करता येईल. कामाचा तांत्रिक वाव सोबत जोडला आहे. या प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपूढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कामास प्रशासकीय मंजूरी मिळणे साठीचा प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. पवार स.बा. :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १७ मधील माळीवाडा वेस ते फुलसौंदर चौक पंचपीर चावडी पर्यतच्या रस्त्याचे ४०एम.एम. जाडीचे आस्फाल्टीक कॉक्रीट( डांबरीकरण) करणेचे कामास व एस्टीमेंट रू. १०,५२,८७१/-( रूपये दहा लाख बावन्न हजार आठशे एक्काहत्तर फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ.खरपुडे जयश्री सुरेश

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.